पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 27/02/2020 (गुरूवार)
(दुपार)

---

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक

1) पो.स्टे. देवलापार :– अंतर्गत 18 कि.मी. अंतरावर मौजा चोरबहुली शिवार येथे दिनांक 26/02/2020 चे 12.00 वा. ते 13.30 वा. दरम्यान देवलापार पोलीस पथक यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन देवलापार पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन एम. एच.– 34/एम – 5275 क्रमांकाच्या ट्रकला थांबविले असता आरोपी वाहन सोडुन पसार झाले. सदर वाहन तपासले असता त्यामध्ये एकुण 39 गाई कि. 3,4000/–रू. ही जनावरे निर्दयतेने वाहतुक करतांना मिळून आले. त्यापैकी 5 जनावरे मृत अवस्थेत आढळुन आली. वाहनासह एकुण किंमती 18,40,000/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलिस हवालदार राजेनद्र वाळके, पो.स्टे. देवलापार यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. देवलापार येथे वरील आरोपीविरुध्द कलम 11(1) (ड) (घ) (च) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम 5 (अ)(1)(9) महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम सहकलम 429 भादवी तसेच सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री प्रवीण बोरकुटे 9545667223 हे करीत आहे.

2) पो.स्टे. अरोली :– अंतर्गत 10 कि.मी. अंतरावर मौजा निमखेडा येथे दिनांक 26/02/2020 चे 07.00 वा. दरम्यान अरोली पोलीस पथक यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन अरोली पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन एम. एच.– 28/बीबी – 0065 क्रमांकाची टाटा यशदा गाडीला थांबविले. सदर वाहन तपासले असता त्यामध्ये आरोपी क्र. 1) शेख खाजाशेख इस्माइल, वय 27 वर्ष, व 2) शेख करीम शेख रहीम, वय 37 वर्ष, दोन्ही रा. कामठी यांच्या ताब्यातुन एकुण 10 (बैल) कि. 1,00,000/–रू. ही जनावरे निर्दयतेने वाहतुक करताना मिळून आले. त्यापैकी 5 जनावरे मृत अवस्थेत आढळुन आली. आरोपीतांच्या ताब्यातून वाहनासह एकुण किंमती 6,00,000/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे सहायक पोलिस निरीक्षक श्री विवेक सोनवने, पो.स्टे. अरोली यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. अरोली येथे वरील आरोपीतांविरुध्द कलम 279, 431, 429, 109 भादवी सहकलम 11(1) (ड) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम 5 (अ)(1)(9) महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री विवेक सोनवने 8805730362 हे करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. कळमेश्वर – दिनांक 22/02/2020 चे 13.00 वा. चे सुमारास पो.स्टे. कळमेश्वर हद्दीत फिर्यादी यांची 16 वर्षीय अल्पवयीन बहीनीला आरोपी नामे– प्रभाकर देहारे, रा. दोतकी (म. प्र) याने फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 363 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार लक्ष्मण रूडे 9923352646 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर